# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०.०९.२०२४ (सोमवार)**

---

## अवैधरित्या जुगार खेळणा—या आरोपीवर कारवाई, ६ आरोपी व ६ मोटर सायकलसह एकुण ४,७७,८९०/—रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/०९/२०२४ रोजीचे दुपारी ०४/३० वा दरम्यान पोलीस स्टेशन मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, टेमसना शिवार ता. कामठी येथील पडीत शेत शिवारात काही लोक ५२ तासपत्तयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. यावरून त्वरीत पोलीस स्टेशन मौदा येथील अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मार्फतीने जुगार रेड केला असता जुगार खेळणारे आरोपी नामे **१) नविन संतोष वाकले वय ३५ वर्ष रा. शुक्रवारी तेलीपुरा, नागपुर २) खुशाल रामभाउ कोल्हे वय ५१ वर्ष रा. सक्करदरा रोड, हनुमान मंदीरजवळ भाजीमंडी, नागपुर ३) प्रकाश केशव चाहांदे वय ३५ वर्ष रा चिचाळा ता भिवापुर नागपुर ४) तुळशीराम लक्ष्मण कावरे वय ३९ वर्ष रा जुनी शुक्रवारी नागपुर ५) राजेंद्र सुर्यभान वाघुलकर वय ४८ वर्ष रा जुना बगडगंज नागपुर ६) विशाल वसंतराव लोणारे वय २९ वर्ष रा जुनी मंगळवारी, भांडेवाडी नागपूर** हे ५२ तासपत्त्यावर जुगार खेळतांना मिळुन आले. त्याचे ताब्यातुन नगदी १७,८९०/—रू व वेगवेगळ्या कंपनीचे ६ मोबाईल किमती ६५०००/—रू तसेच घटनास्थळी ६ मोटर सायकल १) होंडा कंपनीची डिओ मोपेड क्र एम एच ४० बीडबल्यु ५८१३ किमती ५०,०००/—रू २) टीवीएस ज्युपीटर मोपेड क्र एम एच ४० सीएच ४८१० किमती ५५०००/— ३) बजाज एव्हेंजर मो.सा क्र एम एच ४९ एसी ३६९० किमती ७०,०००/—रू ४) टीवीएस ईलेक्ट्रॉनिक मोपेड क्र एम एच ४९ सीए ०११७ किमती ५५,०००/— ५) याम्हा एफ झेड मोटर सायकल क्र एम एच ३१ एफ के ०८९७ किमती ९०,०००/—रू ६) बजाज पल्सर मोटर सायकल क्र एम एच ४० बीडी ०३७९ किमती ७५०००/—रू असे वाहन एकुण किमती ३,९५,०००/—रू **असा एकुण ४,७७,८९०/—रू चा** माल मिळुन आल्याने आरोपीतांविरूध्द कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार ( भापोसे ), मा श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. संतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग, यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, यांचे सोबत पोलीस स्टॉफ सपोनि मनोज चौधरी, पोलीस उपनिरीक्षक श्री महेश बोथले, पोहवा संदीप कडु संदीप कडु, गणेश मुदमाळी, रूपेश महादुले, प्रकाश गाठे, राजु आंधळे, राजेंद्र गौतम, पोना दिपक दरोडे, नितीन सार्वे, आषिश निपाने यांनी केली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरी करण्याचा प्रयत्न करणा—या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण खापा पोलीसांची कारवाई

पो.स्टे. खापा :— दिनांक ३०/०९/२४ चे ०९/०० वा दरम्यान खापा पोलीस हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, मौजा चारगाव जवळ राजस्व विभागाच्या अत्यारित असलेल्या खैरी नाल्या जवळ काही इसम अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक करत आहे. अश्या मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पंचासह जात असतांना सिरोजी ते बडेगाव प्रजीमा या कच्च्या रोडवर एक ट्रॅक्टर ट्रॉली सह दिसला पोलीसांनी त्यां ट्रॅक्टर ला थांबवण्याचा प्रयत्न केला असाता, ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर ट्रॉली रोडच्या कडेला लावुन तो ट्रॅक्टर वर हजर असलेल्या त्याच्या २ साथीदारासह तेथुन झुडपी जंगलात पळुन गेला. पोलीसांनी ट्रॅक्टर ची पाहणी केली असता त्यात १) **१ ब्रास रेती किंमत ४०००/— रूपये २) तीन फावडे किंमत ३००/— रू, ३) ३ घमेले किंमत ३००/— रू व एक लाल रंगाचा महीद्रा ५७५ डी आय मॉडलचा बिना क्रमाकाचा ट्रॅक्टर किंमत ४,००,०००/— रूपये ४) विना नंबर ची ट्रॉली कींमत १,००,०००/— रूपये असा एकुण ५,०४,६०० रूपयाचा**

**मुददेमाल जप्त** केला. **अज्ञात आरोपीतांविरूध्द पोस्टे खापा येथे** कलम ३०३(२), ३ (५), बि.एन.एस २०२३, ४८(७),४८(८) म.ज.म.स १९६६, ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतीबंधक अधिनीयम १९८४ ,कलम ४,२१, खाण आणी खनिज अधि १९५७,अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील फरार आरोपीचा शोध सुरू आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए.पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री अनिल म्हस्के (भा.पो.से) उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी व पोउपनि जंगम, पोलीस अंमलदार बटाउवाले यांनी पार पाडली.



## अवैधरित्या रेतीची चोरी करणा—या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण सावनेर पोलीसांची कारवाई

पो.स्टे. सावनेर :— दिनांक २९/९/२४ चे १९/०० वा दरम्यान रोजी सावनेर पोलीस हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, काही इसम अवैध रित्या रेतीचे उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक करत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पो स्टे हद्दीत पेट्रोलींग केली असता मौजा सिल्लोरी शिवार येथे आरोपी ट्रॅक्टर चालक नामे — **सुरज दिलीप मरसकोल्हे वय २३ वर्ष रा. पाटणसावंगी ता.सावनेर** हा त्याचे ट्रॅक्टर ट्रॉली व त्यामध्ये १ ब्रास रेतीसह मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता त्याने त्याचा मालक नामे— **सुरेश इरखडे रा. पाटणसावंगी ता.सावनेर** यांचे सांगीतले वरून ट्रॅक्टर मध्ये रेती चोरून नेत असल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यातुन विना नंबर प्लेट असलेला ट्रॅक्टर व ट्रॉली किमंती ५,००,०००/रू व १ ब्रॉस रेती अंदाजे किमंत ५,०००/रू असा एकुण ५,०५,०००/— रूपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे. आरोपी ट्रॅक्टर चालक नामे —सुरज दिलीप मरसकोल्हे वय २३ वर्ष रा. पाटणसावंगी ता.सावनेर आणि ट्रॅक्टर मालक **सुरेश इरखडे रा. पाटण सावंगी ता.सावनेर** यांच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३(२),४९ बि.एन.एस अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री अनिल म्हस्के (भा.पो.से) उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक आणि पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सफौ रॉय, पोहवा रवि मेश्राम, नापोशिं कांबळे, दाउद मोहंमद यांनी पार पाडली.

## कत्तली साठी नेत असलेल्या ०५ जनावरांची सुटका, ३ आरोपीतांवर गुन्हा नोंद .
## नागपुर ग्रामीण बेला पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक २९/०९/२४ चे १७/०० वा दरम्यान रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की बुटीबोरी कडुन चंद्रपुर कडे जाणा—या एन.एच. ४४ हायवे वर काही इसम निर्दयपणे कत्तल करण्यासाठी गोवंश जनावरांची अवैध वाहतुक करत आहे. अश्या मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी केली असता, मौजा सोनेगाव लोधी साई ढाबा समोर एन.एच. ४४ हायवे वर संशयीत रित्या एक **अशोक लेलॅन्ड पिकअप क्र.एम.एच.४९ बी झेड ३८५०** ही गाडी नाकाबंदी दरम्यान तपासली असता. गाडी थांबवुन पोलीसांनी पंचा समक्ष चालकाला आणि क्लिनर ला त्यांची नावे विचारली असाता त्यांनी **१) प्रनय निरंजन सधुने वय १८ वर्षे रा. रा गोरेवाडा नागपुर २) अहमद राजा शेख जमिल वय १८ वर्ष रा. मांजरी वनदेवी चौक साईमंदीर जवळ नागपुर** अशी नावे सांगितली. त्याचे ताब्यातील वाहनाची पाहणी केली असता मागील डाल्यात अरूंद जागेत ४ पांढ—या रंगाचे बैल आणि १ लाल रंगाचा बैल मिळुन आले त्यांना चारा पाण्याची कोणतीही सोय केलेली नव्हती. त्यांना हालचाल करता येणार नाही अशा प्रकारे कृर वागणुक दिली आहे असे दिसुन आले. वाहन चालकास जनावरांबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतेही कागदपत्र नव्हते. अधिक विचारपुस करता त्यांनी सांगितले की, सदर गाडीचा मालक आरोपी क्र ३) नामे मोहम्मद जुबेर कुरेशी वय ३२ वर्ष, खंते नगर टेका, डॉ.आंबेडकर मार्ग, नागपुर याच्या सांगण्यावरून सदर जनावरे काटोल येथुन कत्तलीसाठी निजामाबाद येथे नेत आहोत. **घटनास्थळावरून १) चार पांढ—या रंगाचे बैल किंमत ४०,०००/— रूपये २) एक लाल रंगाचा बैल किंमत १०,०००/—रूपये, ३) ॲपल कंपनीचा एक मोबाईल किमंत ४०,०००/— रू ४) ओप्पो कंपनीचा एक मोबाईल किंमत ५०००/— रूपये ५) अशोक लेलेंन्ड पिकअप क्र.एम.एच.४९ बी झेड ३८५० किमंती ५,५०,०००/— रूपये एकुण मुददेमाल ६,४५,००० पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.** फिर्यादीच्या रिपोर्ट वरून आरोपीविरूध्द **पोस्टे बेला येथे कलम ११(१) (क),(ज),(च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनीयम १९६० सी सह कलम ५ (अ) (१) ५(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि सह कलम १८४ मोटर वाहन कायदा सह कलम ४९ भारतीय न्याय संहीता अन्वये** गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पो.हवा. सुधिर राठोड पो.स्टे. बेला मो.नं. ९९२२४२००५२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री दिपक अग्रवाल (भा.पो.से) उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बेला येथील ठाणेदार सहा पोलीस निरीक्षक सी. बी.चव्हाण, पोउपनि खंडेराव बोळगिर, संतोष चव्हाण, पोलीस अंमलदार निलकंठ पिंपळे, ओम राठोड आणि सैनिक यांनी पार पाडली.

## प्राणांतिक अपघात

**पो.स्टे. कन्हान** :— दिनांक २९/९/२४ चे १५/०० वा. ते १६/०० वा दरम्यान, नागपुर ते रामटेक जाणा—या, कन्हान नदीच्या पुलीयावर, यातील मृतक नामे — संदिप अशोक राऊत वय ३४ वर्ष रा. मोदी क्लब, हनुमान मंदीराच्या मागे, कामठी कन्हान हा त्याची **मोटार सायकल क्र. एम. एच. ४० सी. के. ४१५५ गाडीने कामावरून घरी परत जात असातांना नागपुर ते रामटेक जाणा—या बस क्र. एम.एच. ४० एन ८६२६ च्या चालकाने कन्हान नदीच्या पुलीयावर ओव्हरटेक घेत असतांना भरधाव वेगाने येवुन संदिप याच्या मो. सा. क्र. एम. एच. ४० सी. के. ४१५५ धडक दिली त्यामुळे संदिप खाली पडला व जबर मार लागला. त्याला उपचाराकरिता कामठी शासकीय रूग्णालय येथे घेउन गेले, डॉक्टर साहेबांनी तपासुन मृत घोषीत केले**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— फिर्यादी श्री. अशोक शंकरराव राउत वय ६४ वर्ष रा. मोदी क्लब, हनुमान मंदीराच्या मागे, कामठी कन्हान यांच्या रिपोर्ट वरून बस क्र. एम.एच. ४० एन ८६२६ च्या चालका विरूध्द **पोस्टे** कन्हान येथे कलम १०६(१), २८१ भारतीय न्याय संहीता १८४ मोटर वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोहवा नरेश श्रावनकर मो.नं. ९८२३२०३९०६ हे करीत आहे.

## बुट्टीबोरी येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. ३०/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे बोरी हद्दीतील मौजा धवलपेठ येथील पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्याने पोस्टे बोरी हद्दीतील मौजा धवलपेठ येथील पारधी बेडा येथे सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या एकूण ३ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे **आरोपी १) प्रकाश उजा काळे २) देवा कन्हैयागिरी चव्हान रा आसोला व १ महिला आरोपी** यांचे ताब्यातून मोहाफुल गावठी दारू १०० लिटर एकूण किंमती ५०००/—रू चा तसेच ८ प्लास्टीक ड्रम मध्ये मोहाफुल उकडता रासायनिक सडवा २०० लीटर किंमती ३२०००/—रु तसेच मोहाफुल दारू काढण्याचे इतर साहित्य ड्रम, लाकूड इत्यादी मिळून किमती ७०००/— रु असा एकुण ४४०००/—रू चे मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले. **आरोपी क्र २** चे ताब्यातुन प्लास्टीक डबकीतुन ५० लीटर मोहाफुल गावठी दारू कि २५००/—रू ६ प्लॉस्टीक ड्रममध्ये १२०० लीटर मोहाफुल दारू सडवा किमत २४०००/—रू व दारू गाळण्याचे इतर साहीत्य ५०००/—रू असा एकुण ३१५००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महीला आरोपी यांचे ताब्यातुन ७ प्लॉस्टीक डबकीमध्ये ७० लीटर मोहाफुल गावठी दारू कि ३५००/—रू तसेच १२ प्लॉस्टीक व लोखंडी ड्रम मध्ये २०० लीटर मोहाफुल रासायनिक सडवा किमती ४८०००/—रू इतर दारू गाळण्याचे साहीत्य कि ८०००/— असा एकुण ५९,७००/—रू चा माल जप्त करण्यात आला. तिनही कारवाई दरम्यान **एकुण १३५२००/—रू** चा मूद्देमाल जप्त करून नाश करण्यात आला. नमुद ३ आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन बोरी येथे कलम ६५(बी), (सी), (ई), (फ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सपोनि मनोज गदादे, जिवन राजगुरू, सफौ मिलिंद नांदुरकर, विनोद काळे, पोहवा संजय बांते, चापोहवा मुकेश शुक्ला, चापोशी आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.**



पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जि नागपुर